# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२३

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### शासकीय रुग्णालयात कोव्हिड-१९ रुग्ण दगावल्यास त्याच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(१) ५०४५ (२३-११-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय रुग्णालयात कोव्हिड-१९ रुग्ण दगावल्यास त्याच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्यास शासन बांधील आहे असे निरीक्षण उच्च न्यायालयाने माहे ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या आठवड्यात नोंदविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही महिन्यांपूर्वी सायन रुग्णालयात कोव्हिड-१९ बाधितांचा मृतदेह वॉर्डमध्येच ठेवून दुसऱ्या रुग्णांवर तेथेच उपचार करण्यात आले होते, याची दखल घेत मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासंबंधी मा.लोकप्रतिनिधींनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती, त्यावरील सुनावणीत न्यायालयाने उक्त निरीक्षण नोंदविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, ज्या कोरोना रुग्णाचा मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने यंत्रणा नेमावी अशा सूचना देखील दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मृत रुग्णांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२२-०६-२०२३) : (**१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) शासनाच्या दिनांक २६.११.२०२१ च्या शासन निर्णयान्वये कोविड-१९ या आजारामुळे निधन पावलेल्या व्यक्तीच्या निकट नातेवाईकास रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) इतके सानुग्रह सहाय्य राज्य आपत्ती मदत निधीमधून प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा परिषद, बीड येथील अनुसूचित जमातीच्या विशेष भरती मोहिमेंतर्गत व औरंगाबाद येथे निवड झालेल्या पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत

**(२) ९१९३ (१०-०६-२०२१) श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद, बीड येथील अनुसूचित जमातीच्या विशेष भरती मोहिमेंतर्गत व औरंगाबाद येथे निवड झालेल्या उमेदवारांना कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर वित्त विभागाच्या दिनांक ४ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास झालेल्या पद भरतीवरील निर्बंधाच्या अनुषंगाने नियुक्ती आदेश देण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, यानुसार राज्यातील सर्व जिल्हा परिषदेकडून अधिसंख्य पदावरील प्रलंबित नियुक्त्यांबाबतची माहिती शासनाने दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी निर्गमित केलेल्या पत्रान्वये मागविण्यात आली असून, सदर माहिती वित्त विभागास सादर करण्यात आली आहे काय,

(३)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आहे, त्यानुषंगाने प्राप्त माहितीच्या आधारे निवड झालेल्या पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत शासनाने सर्वसाधारण धोरण निश्चिती करुन त्याची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२३) : (**१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) जिल्हा परिषद, औरंगाबाद अंतर्गत ग्रामविकास विभागाचे दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ नुसार जिल्हा परिषदेची निवड यादी / प्रतिक्षा यादीतील ज्या उमेदवारांना दि.०४ मे, २०२० नुसार नियुक्त्या देण्यांत आल्या नाहीत त्यांना नियुक्ती देण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात लातूर जिल्ह्यातील कोविड सेंटरला भोजन पुरविणाऱ्या पुरवठादारांची थकीत देयके अदा करण्याबाबत

**(३) १००३४ (१८-०६-२०२१) श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लातूर जिल्ह्यातील कोविड सेंटरला गेल्या सहा महिन्यांपासून भोजन पुरवणाऱ्या पुरवठादारांचे देयक थकीत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविड केअर सेंटरकरिता ठरवलेल्या नियमावलीनुसार पुरवठादाराकडून सेवा पुरविली जात असतानाही या पुरवठादारांची देयके थकीत ठेवण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने भोजन पुरवठादारांची थकीत देयके अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२२-०६-२०२३) : (**१), (२) व (३)   हे खरे नाही.

लातूर जिल्हयातील कोविड सेंटरला गेल्या सहा महिन्यापासून भोजन पुरविणाऱ्या पुरवठादारांचे थकीत देयक रु. ३,७२,५१,६००/- (रुपये तीन कोटी बहात्तर लक्ष एकावन्न हजार सहाशे फक्त) इतके दिनांक २२.०३.२०२१ रोजी अदा करण्यात आले आहे.

तसेच रु. २,५४,७१,३८१/- (रुपये दोन कोटी चौपन्न लक्ष एकाहत्तर हजार तीनशे एक्क्याऐंशी फक्त) इतके दिनांक १७.०६.२०२१ रोजी अदा करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा परिषद, उस्मानाबाद येथील “कनिष्ठ लेखाधिकारी” हे पद बिंदूनामावलीप्रमाणे भरण्यात आले नसल्याबाबत

**(४) १०१७५ (२०-०७-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद, उस्मानाबाद येथील वित्त विभागांतर्गत “कनिष्ठ लेखाधिकारी” हे पद इतर मागासवर्गीय जागेसाठी रिक्त असलेल्या बिंदू नामावलीप्रमाणे भरणे आवश्यक असताना सन २०१४ मध्ये   जिल्हा निवड समितीने गैरमार्गाने भटकी जमात (ब) या प्रवर्गामधून भरल्याचे सहाय्यक आयुक्तांच्या चौकशीत निष्पन्न झाल्याने शासनाने विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडून सदर प्रकरणाचा अहवाल मागविला आहे,   हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवालात कोणत्या शिफारसी करण्यात आल्या आहेत व त्यानुषंगाने सदर प्रकरणातील दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडून सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी व नोडल ऑफीसर जिल्हा निवड समिती तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) तसेच त्याअनुषंगाने तत्कालीन सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दि.०४.०१.२०२१ व दि.१९.०४.२०२१ अन्वये कारणे दाखवा नोटीस देऊन लेखी खुलासे मागविण्यात आलेले आहेत. तथापि, तत्कालीन अधिकारी/ कर्मचारी यांनी सदर खुलाशात दि.२९.०३.१९९७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केलेली १०० बिंदुनामावलीच्या क्रमानुसार वि.जा.(अ) प्रवर्गाचा क्रम झाल्यानंतर रिक्त पद भ.ज.ब. (बिंदु क्र.४) या प्रवर्गातून भरणेबाबत वित्त विभागांतर्गत कनिष्ठ लेखाधिकारी पदाची भरती नियमाप्रमाणे बरोबर केलेली असल्याबाबत नमुद केले आहे.

---

## सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(५) १०१७८ (०८-११-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करून सहाय्यक शिक्षकांचा परिविक्षाधीन कालावधी कमी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप तसेच प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सहाय्यक शिक्षक परिविक्षाधीन कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२४-०५-२०२३) :** (१) शिक्षण सेवक कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करुन परिविक्षाधीन कालावधी कमी करण्याबाबतची बाब शासनस्तरावर विचाराधीन नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साखरखेडा (ता.नरखेड, जि.नागपूर) ग्रामपंचायत अंतर्गत प्रशासकीय कामासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या प्लॉटवर ग्रामस्थांनी अतिक्रमण केल्याबाबत

**(६) १२६८० (०१-०६-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरखेडा (ता.नरखेड, जि.नागपूर) ग्रामपंचायत अंतर्गत सन १९८० मध्ये लोकसंख्या वाढीमुळे शासकीय खर्चाने विकत घेतलेल्या जमिनीवर ले-आऊट टाकून गरजूंना प्लॉट वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील काही प्लॉट ग्रामपंचायत प्रशासकीय कामासाठी राखीव ठेवण्यात आले असून सदर प्लॉटवर ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे ग्रामस्थांनी अतिक्रमण केल्यामुळे तेथे राहत असलेल्या रहिवाशांना समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सदर ग्रामस्थांनी अतिक्रमण करून ताबा घेतलेल्या प्लॉटवरील अतिक्रमण हटवून तेथील रहिवाशांच्या समस्या दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०६-२०२३) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मौजा साखरखेडा, ता. नरखेड जि. नागपूर अंतर्गत रहिवाशांच्या समस्या दूर करण्यासाठी श्रीमती पारुबाई हरिश्चंद्र भलावी यांचे घरकुल मंजूर असून महसूल जागेवरील राखील प्लॉट हा प्रधानमंत्री आवास योजनेतून घरकुल बांधकामाकरीता अत्यंत गरज असल्याने त्यांना व इतर घरकुल मंजूर गरजू लाभार्थ्यांना सदर प्लॉट क्र. २२ रितसर वाटप करण्याबाबत ग्रामपंचायत ठराव दिनांक २८.१२.२०२२ नुसार प्रस्ताव

ग्रामपंचायतीने गट विकास अधिकारी पंचायत समिती नरखेड यांचे मार्फत तहसिलदार, नरखेड यांचे कार्यालयाकडे सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षकांना अशैक्षणिक कामे न देण्याबाबत

**(७) १३२९६ (०६-०४-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्यात शिक्षकांना जनगणना व मतमोजणी या राष्ट्रीय कामकाजाव्यतिरिक्त कोणतीही कामे देण्यात येवू नयेत, असा नियम आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नियमाचे उल्लंघन करुन सद्य:स्थितीत शिक्षकांना शिक्षणाव्यतिरिक्त शालेय पोषण आहार योजना देखरेख, अहवाल लेखन याव्यतिरिक्त अनेक कामे देण्यात असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी राज्यातील शिक्षकांना अशैक्षणिक कामे न देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२४-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) शासन परिपत्रक दिनांक १८.०६.२०१० अन्वये शाळेत पदस्थापित केलेला कोणताही शिक्षक इतर कोणत्याही शाळा / कार्यालयात काम देण्यात येणार नाही तसेच त्यास दशवार्षिक जनगणना, आपत्ती निवारणाचे काम किंवा स्थानिक प्राधिकरण, राज्य विधानसभा व लोकसभा निवडणूकांच्या कर्तव्याखेरीज इतर कोणतेही शिक्षणेत्तर काम देण्यात येणार नाही, असे आदेश दिले आहेत.

तसेच शासन परिपत्रक दिनांक ०३.०५.२०१३ नुसार शाळाबाह्य कामाकरीता शिक्षकांच्या सेवा वापरण्यात येऊ नये व इतर कार्यालयात प्रतिनियुक्तीने किंवा तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असणाऱ्या शिक्षकांच्या सेवा रद्द करुन नियुक्तीच्या शाळेवर वर्ग करण्यात याव्यात, असे निर्देश संबंधितांना देण्यात आले आहेत.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियमांतर्गत कोव्हीड १९ मुळे उद्भवलेल्या संवर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण याकरीता शिक्षकांच्या सेवा कोरोना योध्दा म्हणून घेण्यात आल्या होत्या. परंतु सदरची साथ नियंत्रणात आल्यानंतर व शासनाच्या निर्देशानुसार शाळा सुरु झाल्यामुळे शिक्षकांना सदरच्या सेवेतून कार्यमुक्त केले आहे.

---

## मौजा भोजापूर (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील नागरिकांना बेघर करण्यात आल्याबाबत

**(८) १३४९९ (१३-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गट ग्रामपंचायत, मानापूर (ता.रामटेक, जि.नागपूर) अंतर्गत मौजा भोजापूर येथील वडिलोपार्जित मालकी हक्क व वहिवाट असलेल्या १५ नागरिकांच्या घरांवर अतिक्रमणाची कार्यवाही करून दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास सदर बांधकामे तोडण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यवाहीकरीता कायदेशीर नोटीस, संबंधित तहसीलदार, खंडविकास अधिकारी व संबंधित वरिष्ठ प्रशासकांची परवानगी व जागेची मोजणी करून सिमांकन करणे आदी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर बांधकामे तोडणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करून ज्यांची बांधकामे तोडण्यात आली त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०६-२०२३) : (१)** होय, हे खरे आहे.
गट ग्रामपंचायत, मानापूर (ता. रामटेक, जि. नागपूर) अतंर्गत मौजा भोजापूर येथील शासकीय जमीनीवर अतिक्रमणधारकांनी अतिक्रमण केले असल्याने व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून मंजूर सिमेंट रस्ता व नाली बांधकामाचे काम पूर्ण करण्यासाठी अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रामटेक यांनी तहसिलदार, रामटेक यांची परवानगी घेऊन अतिक्रमण काढण्याची कार्यवाही पूर्ण केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
( ४ ) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील परिचारीकांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(९) १३६५६ (२८-०६-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटी पद्धतीने परिचारीकांची पदे भरण्याच्या घेतलेल्या निर्णयास महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटनेने विरोध दर्शविला असून या निर्णयातून परिचारीकांना वगळण्याची विनंती लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री महोदयांना दिनांक १२ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपुर शहरातील मेयो, मेडीकल, सुपर स्पेशालिटी, ट्रामा केअरमधील ८५० परिचारीका दिनांक २३ मे, २०२२ रोजी पासुन बेमुदत संपावर गेल्या असून कोरोना काळात परिचारीकांनी केलेली सेवा लक्षात घेऊन राज्यात परिचारीकांची भरती व वेतन निश्चिती होण्यासाठी तसेच इत्यादी मागण्यांबाबत परिचारीका संघटनांनी आंदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय, तसेच, परिचारीकांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे
(३) असल्यास, परिचारीकांच्या बेमुदत संपामुळे राज्यातील शासकीय रुग्णालय तसेच नागपूर मधील मेयो, मेडीकल व सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील रूग्णसेवेवर परिणाम होत असून रूग्ण दगावण्याच्या घटना

घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, केंद्र शासनाप्रमाणे समान वेतनाची मागणी व प्रशासकीय बदली रद्द करून विनंती बदली करण्याबाबत तसेच परिचारिकांची कंत्राटी पद्धतीने भरती न करता कायमस्वरुपी भरती करण्याच्या परिचारीकांच्या संघटनांनी केलेल्या इतर मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०६-२०२३) :** (१)होय हे खरे आहे.
(२)सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या परिचारीका सदर संपात सहभागी झालेल्या नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटनेचे दि.०५.०५.२०२२ रोजीचे पत्र विभागास प्राप्त झाले आहे. सदर पत्रातील मागण्यांच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात आलेली आहे:-
१.शुश्रृषा संवर्गातील न्यायप्रविष्ठ प्रकरणातील संवर्ग वगळून इतर संवर्गातील पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करुन पदस्थापना देण्यात आल्या आहेत. तसेच पदभरती प्रक्रिया देखील राबविण्यात आलेली आहे.
२. शुश्रृषा संवर्गाची दि.२४.१०.२०२१ रोजी घेण्यात आली होती. या परिक्षेचे पेपर फुटल्याचे निदर्शनास आल्याने या प्रकरणी गुन्हे दाखल झाले आहेत. ही पदभरती प्रक्रिया दि.२९.०६.२०२२ रोजी रद्द करण्यात आली असून सुधारित पदभरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.
३.रिक्त पदे भरेपर्यंत तात्पुरती पदे बाह्ययंत्रणा अथवा राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (तांत्रिक संवर्गासह) भरण्यात येतात.
४.सातव्या वेतन आयोग भत्त्यांसाठी बक्षी समितीचा खंड-२ चा अद्याप अहवाल प्रसिध्द झाला आहे. त्यातील शुश्रृषा संवर्गातील विविध पदांच्या वेतनस्तरात सुधारणा करण्यात आलेली आहे. भत्यांबाबत कोणत्याही संवर्गाचा निर्णय अद्याप झालेला नाही.
५.परिचारीका संवर्गाच्या नियमित व विनंती बदल्या ह्या शासनाच्या विहित नियमानुसारच करण्यात येत आहे.
(५)प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशिम येथील स्त्री रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरु करणेबाबत

**(१०) १३६७८ (२५-०८-२०२२) श्री.किरण सरनाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १३२०५ ला दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम येथील जिल्हा स्त्री रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरु नसल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वाशिम येथील जिल्हा स्त्री रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२६-०६-२०२३) : (**१) होय हे अंशत: खरे आहे.
जिल्हाधिकारी, वाशिम यांचे आदेशानुसार जिल्हा स्त्री रुग्णालय, वाशिम हे सन २०२० मध्ये कोविड रुग्णालयकरिता वापर करण्यास सुरूवात केली.
एप्रिल २०२२ मध्ये जिल्हा शल्य चिकित्सक, वाशिम यांचेव्दारे इमारतीचा ताबा घेण्यात आला.
(२) जिल्हा स्त्री रुग्णालय, वाशीम येथील DCH/DCHC हे जिल्हा रुग्णालय, वाशीम येथे स्थलांतरीत करण्यात आले असून, माहे ऑगस्ट, २०२२ पासुन प्रसूती कक्ष पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात आलेला आहे. माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये शस्त्रक्रियागृहाचे काम पुर्ण झाले व शस्त्रक्रियागृहाचे स्वॅब निगेटीव्ह आल्यानंतर दि.१७.११.२०२२ पासून सीझेरियन सेवा सुरू करण्यात आली. तेथे दिनांक २३.११.२०२२ रोजी पर्यंत ६५५ प्रसुती करण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये ३४९ पुरुषबालक व ३०६ स्त्री बालक आहेत. बाह्य रुग्ण विभागात ७०० हून अधिक प्रसुतीपुर्व मातांची तपासणी व इतर महिलांची तपासणी करण्यात आली आहे. १८९ मातांना PPIUCD गर्भ निरोधांची सेवा देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईसह राज्यात राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने दिलेल्या निर्देशाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(११) १५०७० (१९-१०-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात पदव्युत्तर वैद्यकीय विद्यार्थ्यांना होत असलेला मानसिक ताण व इतर समस्यांची दखल घेत सर्व वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांमधील निवासी डॉक्टरांच्या समस्या सोडविणे व इतर सोयी-सुविधा देण्याचे निर्देश राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने (एनएमसी) दिले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये पुरेशी विश्रांती, साप्ताहिक सुट्टी, तणावाखाली असलेल्यांसाठी समुपदेशन, नियमित योग सत्रे आयोजित करणे, आवश्यक असेल तेव्हा रजा मंजूर करणे आणि त्यांच्या सन्मानाचा आदर करणे याचा समावेश होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२२-०६-२०२३) : (**१) होय
(२) होय
(३) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने दि.२२/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधित संस्थांना राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने दिलेल्या निर्देशाची अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक उपाययोजना करण्याबाबत कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाच्या सुरक्षा रक्षक मंडळात एका विधवा महिलेला उंचीअभावी नोकरी नाकारण्यात आल्याबाबत.

**(१२) १५७९० (२८-१२-२०२२) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यालयात एक विधवा महिला चंद्रकला कांबळे या अनुकंपा तत्वावरील नोकरी मिळणे दुरापास्त झाले असल्याचे दि.६ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परंतु त्यांची उंची कमी असल्याने नोकरी मिळणार नसल्याचे कारण देण्यात येत असल्याने त्यांच्यासमोर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सदर महिलेला खास बाब म्हणून अनुकंपा तत्वावरील नोकरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०४-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

श्रीमती चंद्रकला कांबळे यांनी पतीच्या जागी अनुकंपा नोकरी मिळण्यासाठी सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई ठाणे जिल्हा यांचेकडे अर्ज सादर केला होता. तथापि, त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात येवून शारीरीक चाचणी घेण्यात आली असता त्या शारीरिक चाचणी निकषाची पूर्तता करत नसल्याने त्यांचा अर्ज फेटाळण्यात आला आहे.

(२) शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार शारीरीक चाचणीच्या निकषाची पूर्तता होत नसल्याने श्रीमती चंद्रकला कांबळे यांचा अर्ज फेटाळण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायत कार्यालयामधील संगणक परिचालकांना मिळणाऱ्या मानधनाबाबत

**(१३) १६२४४ (२८-१२-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामपंचायत कार्यालयात कार्यरत असलेल्या संगणक परिचालकांना मिळणारे मानधन तुटपुंज्या स्वरुपाचे असून, त्यांना सदरहू मानधन वेळेवर मिळत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ग्रामपंचायत स्तरावर एका संगणक परिचालकाची कर्मचारी म्हणून कायमस्वरुपी नियुक्ती करू असे लेखी आश्वासन तत्कालीन ग्रामविकास मंत्री यांनी दिनांक १३ मार्च,

२०२१ रोजी वा त्यासुमारास संगणक परिचालक संघटनेला दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संगणक परिचालकांना मिळणाऱ्या मानधनात वाढ करुन सदरहू मानधन विहीत कालावधीत मिळण्यासाठी तसेच त्यांना मिळणारे मानधन ग्रामपंचायतीकडून मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-०६-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) संगणक परिचालक संघटनेच्या मागणीबाबत तत्कालीन ग्रामविकास मंत्री यांनी दि.११ मार्च, २०२१ रोजी संगणक परिचालक संघटनेला पत्र दिले होते.
(३) आपले सरकार सेवा केंद्रात कार्यरत संगणक परिचालकांचे मानधन देणेकरिता देयक संगणक प्रणाली तयार करण्यात आली असून, सदर प्रकल्प राबविणे करिता निश्चित करण्यात आलेली रक्कम प्रत्येक ग्रामपंचायत जिल्हा स्तरीय निधीला वर्ग करते व तो निधी RGSA खात्यात जमा होऊन त्यातूनच संगणक परिचालकांचे मानधन CSC-SPV या कंपनीमार्फत संगणक परिचालकांच्या कामगिरीनुसार दरमहा अदा करण्यात येते.
ग्रामपंचायतींकडून सदर आगाऊ रक्कम जमा करून घेण्यासाठी सातत्याने पाठपुरावा होत असून,रक्कम जमा झाल्यानंतर तात्काळ संगणक परिचालकांचे मानधन अदा करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंचायत समिती पातूर (जि.अकोला) गट विकास अधिकारी व इतर अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशीचा अहवाल शासनाकडे सादर न केल्याबाबत

**(१४) १६२७२ (१९-०१-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंचायत समिती, पातूर (जि.अकोला) येथे सन २०१५-२०१६ या वर्षात कार्यरत असलेले गट विकास अधिकारी, पंचायत समिती तसेच इतर अधिकाऱ्यांचा विभागीय चौकशीचा अहवाल प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, अमरावती यांनी पाच वर्ष होवूनही शासनास सादर केला नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उप मुख्य अधिकारी या पदाकरिता सेवाजेष्ठते नुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पातूर तसेच इतर अधिकारी हे पात्र असतानाही विभागीय चौकशीचा अहवाल शासनास सादर केला नसल्यामुळे त्यांना पदोन्नतीपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पातूर व इतर अधिकारी यांच्या विभागीय चौकशीचा अहवाल शासनास केव्हा सादर करण्यात आला आहे, वा येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०६-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही. पंचायत समिती, पातूर (जि. अकोला) येथील सी. सी. टी. व्ही. खरेदी प्रक्रियेमध्ये अनियमितता केल्याप्रकरणी एकूण ९ अपचारी अधिकारी यांच्याकडून

शासनाच्या दि.१२.०६.२०१९ च्या ज्ञापनान्वये खुलासा मागविण्यात आला होता. सदरहू अपचारी अधिकारी यांनी अभिवेदन सादर करुन त्यांच्यावरील दोषारोप अमान्य केल्यामुळे शासनाच्या दि.०६.१२.२०१९ च्या दोन स्वतंत्र आदेशान्वये एकूण ९ अपचारी अधिकारी यांच्याविरुद्ध तयार करण्यात आलेल्या दोषारोपांची चौकशी करण्याकरीता प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, अमरावती विभाग, अमरावती यांची चौकशी अधिकारी म्हणून तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.) जि. प. अकोला यांची सादरकर्ता अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर या प्रकरणी जोडपत्र-४ मधील दस्तऐवज अपूर्ण असल्याने सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्यक्षात दि.१७.०८.२०२० रोजी जोडपत्र-४ मधील पुराव्याचे कागदपत्र प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, अमरावती विभाग, अमरावती यांना सादर केले आहेत. सर्व दस्तऐवज दि.१७.०८.२०२० रोजी प्राप्त झाल्यानंतर एकूण ९ अपचारी अधिकारी यांच्या संयुक्त विभागीय चौकशीचे कामकाज सुरु झाले. सदर प्रकरणातील उर्वरीत अपचारी अधिकारी श्री. भंडारे, तत्का. गट विकास अधिकारी यांनी दि.११.१२.२०२२ रोजी त्यांचे अंतिम अभिवेदन चौकशी प्राधिकरणास सादर केले असून सदर प्रकरण दि.१२.१२.२०२२ रोजी अंतिम चौकशी अहवालाकरीता बंद करण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे. सदर प्रकरणाशी संबंधित पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या अपचारी अधिकारी यांना पदोन्नती देण्याबाबतचे प्रकरण मोहोरबंद पाकीटात ठेवण्याचा निर्णय विभागीय पदोन्नती समितीने घेतला आहे.

(३) व (४) २ उप मुख्य कार्यकारी अधिकारी, २ मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि ५ गट विकास अधिकारी अशा एकुण ०९ अपचारी अधिकारी यांच्या संयुक्त विभागीय चौकशी प्रकरणी सुनावणीची कार्यवाही पूर्ण झाली असून सदर प्रकरण अंतिम चौकशी अहवाल तयार करण्याकरीता बंद करण्यात आले आहे.

चौकशी प्राधिकरणाकडे आजमितीस ७६ प्रकरणे अंतिम चौकशी अहवालाकरीता बंद करण्यात आली असून प्रकरण दाखल झाल्याच्या दिनांकानुसार ज्येष्ठतेप्रमाणे प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही केली जात आहे. सदर प्रकरण ज्येष्ठता क्रमानुसार ५८ व्या क्रमांकावर असून ज्येष्ठता क्रमानुसार प्रकरण निकाली काढून अंतिम चौकशी अहवाल शिस्तभंगविषयक प्राधिकरणाकडे सादर करण्यात येईल, असे प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी (अर्धन्यायिक प्राधिकरण) विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती यांनी कळविले आहे.

---

## रस्ते विकास योजना मंजुरी बाबत

**(१५) १६७५७ (२८-१२-२०२२) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००१ ते २०२१ या कालावधीसाठी मंजूर झालेल्या रस्ते विकास योजनेचा कालावधी संपुष्टात आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २०२१ नंतरच्या कालावधीसाठी नवीन रस्ते विकास योजना तयार करण्यासाठी शासकीय समिती गठित झाली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समितीने अहवाल सादर केला आहे हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (२५-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) सदर समितीचे काम सद्य:स्थितीत प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उभ्दभवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाअंतर्गत उमेद महिला कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(१६) १६९७० (२५-०३-२०२३) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभयिनांतर्गत उमेद महिला स्वयंसहायता समुहातील ६० लक्ष महिला सदस्य असून ५० हजार समुदाय संसाधन व्यक्ती व २९१८ कर्मचारी कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमेद अभियानांतर्गत कार्यरत सर्व समुदाय संसाधन व्यक्तींना (कॅडर) रोजगार हमी कायद्याप्रमाणे एक दिवसाचा रोजगार, मासिक किमान वेतन तथा कॅडर नियुक्तीवर असलेली बंदी उठवून १०० टक्के गावात कॅडर नियुक्ती स्वयंसहायता समुहांना खेळते भांडवल व समुदाय गुंतवणूक निधी उपलब्ध करून देणे, सहायक कर्मचारी यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन इत्यादी मागण्या पूर्ण करण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित विभागाला निर्देश देऊन महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभयिनांतर्गत उमेद महिला कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०६-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार समुदाय संसाधन व्यक्तीचे मानधन निश्चित केले जाते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने मानधन वाढीबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांनी त्यांच्या दिनांक १०.०६.२०२२ च्या पत्रान्वये केंद्र शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत कार्यरत केडरचे रु.४२०.२५ कोटीचे दायित्व असून निधी उपलब्धतेच्या मर्यादेमुळे नवीन केडर निवडीच्या मर्यादा आहेत. तरीही अभियानाची आवश्यकता लक्षात घेऊन शेवटच्या टप्प्यातील सर्व जिल्ह्यात केडर निवड प्रक्रिया करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांनी दिनांक ०९.०२.२०२३ च्या पत्रान्वये सूचना निर्गमित केल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातील सहाय्यक कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित ठोक स्वरूपात मानधन अदा करण्यात येते. कमी मानधन मिळत असणाऱ्या जिल्हा व तालुकास्तरावरील

सहाय्यक कर्मचाऱ्यांना किमान वेतनानुसार एकत्रित मानधन अदा करण्यात येत आहे.

वार्षिक कृती आराखड्याच्या मर्यादेत खेळते भांडवल (RF) / समुदाय गुंतवणूक निधी (CIF) चे वाटप करण्यात येते. आजपर्यंत एकूण रु.५२० कोटीचे खेळते भांडवल (RF) व रु.५०५ कोटीचा समुदाय गुंतवणूक निधी (CIF) वाटप करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती विभागातील उपसंचालक शिक्षणाधिकारी व वेतन अधीक्षक कार्यालयामधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१७) १७११८ (२५-०३-२०२३) श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर : तारांकित प्रश्न क्रमांक १५६९० ला दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील उपसंचालक शिक्षणाधिकारी व वेतन अधीक्षक कार्यालयामध्ये अनेक पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरळसेवेच्या संवर्गातील पदभरतीची कार्यवाही सुरु असून पदोन्नतीची पदे भरण्यात आली आहेत,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने अमरावती विभागातील उपसंचालक शिक्षणाधिकारी व वेतन अधीक्षक कार्यालयामधील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१२-०६-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय औद्योगिक संस्थांमधील रिक्त असलेली पदभरती करणेबाबत

**(१८) १७३७३ (२५-०३-२०२३) श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय आय.टी.आय मध्ये अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदाचा कार्यभार कार्यरत शिक्षकांवर येत असल्याने त्यांच्यावरील अतिरिक्त ताणामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासकीय आय.टी.आय मधील रिक्त असलेली पदभरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२२-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील निदेशकांच्या रिक्त पदांना अनुसरुन संस्था स्तरावर तात्पुरत्या स्वरुपात तासिका निदेशक नेमण्यात येतात. सद्य:स्थितीत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये १६४५ निदेशक तासिका तत्वावर कार्यरत असून, ज्याठिकाणी तासिका तत्वावर निदेशक उपलब्ध होत नसतील त्याठिकाणी शिक्षकीय कर्मचाऱ्यांकडे तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर निदेशक उपलब्ध होईपर्यंत अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येतो.

(३) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील नियमित वेतनश्रेणीतील सरळसेवेची शिल्प निदेशकाची १४५७ रिक्त पदे भरण्यासाठी दि.१७/०८/२०२२ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून, दि.२८ व २९ सप्टेंबर, २०२२ रोजी सामायिक परीक्षा (CBT-१) घेण्यात आली आहे. सदर परीक्षेमधील उत्तीर्ण उमेदवारांची व्यावसायिक चाचणी (CBT-२) दि. १६ जून, २०२३ रोजी घेण्यात आली आहे.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व कार्यालयातील सरळसेवेची लिपिक-टंकलेखकाची ३९३ पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि.२०/०१/२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द केली असून कार्यवाही सुरु आहे.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील इतर संवर्गातील ७७२ रिक्त पदे भरण्यासाठी दि.१७/०२/२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून, दि.१६/०४/२०२३ रोजी CBT/ CBT-१ परीक्षा घेण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मूल (जि.चंद्रपूर) येथील उपजिल्हा रूग्णालयाचा १०० खाटांचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(१९) १८०४५ (२५-०३-२०२३) श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूल (जि.चंद्रपूर) येथील उपजिल्हा रूग्णालयाचा १०० खाटांचा श्रेणीवर्धन प्रस्ताव सहसंचालक आरोग्य आयुक्तालय, मुंबई यांच्याकडे प्रस्तावित असल्याचे दि. ११/१/२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय , चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर प्रस्तावास तातडीने मान्यता मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०४-०७-२०२३) : (**१) होय.

(२) आयुक्त कार्यालयाकडून दि. २४.०२.२०२३ रोजीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाची छाननी केली असता, सदर आरोग्य संस्थेचे श्रेणीवर्धन करण्यासाठी जागा उपलब्धतेबाबत

उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मुल यांनी दिनांक १७.०४.२०२३ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कंत्राटी निदेशक पदांना नियमित करण्याबाबत

**(२०) १८५४३ (२५-०३-२०२३) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कंत्राटी तत्वावर मान्यता दिलेल्या ३२६ पदांना नियमित पदे म्हणून मान्यता देणे व त्यावरील कार्यरत शिक्षकांना नियमित वेतनश्रेणीत मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटी निदेशकांच्या मानधनात ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वाढ करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कार्यरत कंत्राटी निदेशकांच्या मानधनात ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२८-०६-२०२३) :**

(१), (२) व (३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सद्यस्थितीत २९७ कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील कार्यरत कंत्राटी शिल्पनिदेशक यांच्या शासन सेवेत नियमित करणेबाबत मागणीच्या अनुषंगाने मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन योग्य तो निर्णय घेण्यात यावा, असा निर्णय दिनांक १६ मे, २०२३ च्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेला आहे. तसेच कंत्राटी निदेशकांच्या मानधनात रु. १५०००/- वरुन रु. २५०००/- वाढ करण्याबाबत निर्णय देखील घेण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.